Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १०४ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.८ जानेवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# वय ८४ झाले तरी थांबायला तयार नाहीत : उपमुख्यमंत्री अजित पवार

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केले कौतुक





**मुंबई**–सरकारी नोकरीत ५८व्या वर्षी निवृत्ती आहे. केंद्र सरकारच्या नोकरीत ६०व्या वर्षी निवृत्ती होते. राजकारणातही निवृत्तीला काही ठरावितक वय आहे. मात्र, काही जण ८४ वर्ष वय पूर्ण झाले तरी, काही जण थांबायला तयार नाहीत, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांना पुन्हा एकदा टोला लगावला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात म्हणाजेच ठाण्यात अजित पवार गटाचा मेळावा पार पडत आहे. यावेळी जमलेल्या कार्यकर्त्यांना संबोधित करताना अजित पवार यांनी अनेक विषयांवर भाष्य केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. तर वयावरून पुन्हा एकदा शरद पवारांवर नाव न घेता टीका केली आहे. वय ८४ झाले तरी काही जण रिटायर्ड होत नाहीत, अशी टीका अजित पवार यांनी केली आहे. वय झाले की थांबायचे असते पण काही जण अती करतात, असे त्यांनी म्हटले आहे.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पवार म्हणाले की, वय झाले की, थांबायचे असते. पण काही जण हट्टीपणा करतात. कुठे तरी थांबा, आम्ही कामे करायला समर्थ आहोत. कोरोनाच्या काळात काही जणांनी मला सल्ला दिला की, मंत्रालयात जाऊ नका, कोरोना होईल, पण मेलो तरी चालेल तरी, लोकांची कामे करत राहणार, असा निर्धार करून मी रोज सकाळी ८ वाजता मंत्रालयात जात होतो, असे पवारांनी म्हटले आहे

# शंकरपूर येथे धीवर समाज महोत्सव २०२४ तथा वाल्मिकी जयंती महोत्सव साजरा

**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांनी चिमूर तालुक्यातील महर्षी वाल्मिकी मंदिर देवस्थान, एकलव्य सेना ग्राऊंड शंकरपूर येथे एकलव्य ढीवर समाज व कोळी मच्छीमार सहः संस्था शंकरपुर च्या वतीने आयोजित ढिवर समाज महोत्सव २०२४, महर्षी वाल्मिकी जयंती उत्सव तथा प्रबोधन मेळावा कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थिती दर्शविली.

यांप्रसंगी आमदार बंटीभाऊंनी सर्वप्रथम महर्षी वाल्मिकी यांच्या मुर्तीला व सर्व संत महात्म्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर उपस्थित समाजबांधवांना विविध विषयांवर संबोधित करून शुभेच्छा दिल्या. तसेच, ढिवर समाजाच्या विविध मागण्यांसंदर्भात निवेदन स्वीकारून सर्वांना आश्वस्त केले. दरम्यान, समाजबांधवांच्या वतीने आमदार बंटीभाऊंचे पुष्पगुच्छ व शाल–श्रीफळ भेट देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी प्रामुख्याने सर्वश्री



कार्यक्रमाचे अध्यक्ष शासकीय आश्रम शाळा जांभूळघाट चे मुख्याध्यापक व्यंकटराव चाचरकर, कार्यक्रमाचे उदघाटक शिवसेना जिल्हाप्रमुख बंडूभाऊ हजारे, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजूभाऊ देवतळे, भाजपा ज्येष्ठ नेते भिमराव ठावरी, ग्रा.पं. सदस्या बेबीताई डहारे, चंद्रपूर जिल्हा भोई समाज सेवा संघ जिल्हा संघटक मोरेश्वर खेडेकर, एकलव्य सेना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष प्रा. के. एन नान्हे , एकलव्य सेना पूर्व विदर्भ संघटक डॉ. प्रकाश नान्हे , भंडारा जिल्हा मत्स्यव्यवसाय सह. संघाचे संचालक प्रकाश पचारे, साहित्यिक पराग भानारकर, ग्राम विश्व संघर्ष वाहिनीचे गजेंद्र चाचरकर, सामाजिक कार्यकर्त्यां कोयलताई कामडे तसेच, भाजपा तालूका उपाध्यक्ष तथा जि.प. सर्कल प्रमुख अविनाशभाऊ बारोकर, भाजपा युवा नेते तथा सरपंच ग्रा.पं. मांगलगाव प्रफुल कोलते, भाजपा नेते मनोहर रंदये, तन्नू बघेल, टक्कूसिंह बघेल, भाजपा शक्ती केंद्र प्रमुख सावन गाडगे, भाजपा बूथ अध्यक्ष दौलत समर्थ, भाजपा बूथ अध्यक्ष रमेश चौधरी व अन्य मान्यवर आणि एकलव्य ढीवर समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संरक्षण भिंत व सौंदर्यकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी

## संत जगनाडे महाराज देवस्थान पंचकमिटीचे आमदारांना निवेदन

**चिमूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथे तेली समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात असून संत जगनाडे महाराज देवस्थाना करता जागाही भरपूर आहे. हे देवस्थान चिमूर रोड लगत असून या ठिकाणी दरवर्षी समाजातर्फे मोठमोठे कार्यक्रम घेतल्या जातात त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा संत जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून या कार्यक्रमाचे निमंत्रण व सभागृहाचे लोकार्पण करण्यासाठी समाजाच्या शिष्टमंडळाने आमदार बंटी भांगडिया यांची भेट घेऊन निमंत्रण पत्रिका व निवेदन दिले. चिमूर विधानसभा क्षेत्रामध्ये तेली समाजाची लोकसंख्या ही ५५ हजार च्या दरम्यान असून संत जगनाडे महाराज पुण्यतिथी निमित्त शंकरपूर येथे मोठ्या संख्येने समाजबांधव एकत्र येत असतात. चाळीस ते पंचेचाळीस वर्षापासून संत जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव सुरू



असून दिवसेंदिवस या कार्यक्रमाची व्याप्ती वाढत आहे. संत जगनाडे महाराज देवस्थान चा परिसर मोठा असून या परिसराला संरक्षण भिंत नसल्याने मोकाट जनावराचा वावर जास्त असतो त्यामुळे या परिसराला संरक्षण भिंतीची अत्यंत आवश्यकता असून या परिसराचे सौंदर्यकरण करणे अत्यावश्यक आहे त्याकरता मोठ्या निधीची आवश्यकता असून समाजाच्या शिष्टमंडळाने संरक्षण भिंती करिता व सौंदर्यकरणाकरिता निधी उपलब्ध करून देऊन बांधकाम करून देण्याची विनंती निवेदनाद्वारे आमदार यांना केली आहे. कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका व निवेदन देताना संत जगनाडे महाराज देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष अशोक चौधरी सचिव प्रमोद सहारे, सदस्य रवींद्र राकडे, बंडू भजपुजे, सचिन निकुरे, नरेंद्र आदमने, अरविंद राकडे, आशिष नागोसे, दिनेश दुर्बुडे हे उपस्थित होते.

## परवाना न घेताच सुरू केली वीटभट्टी

# महसूल विभागाची कारवाई

## कंत्राटदारांवर ठोठावला १५ लाखांचा दंड

**मूल । प्रतिनिधी**

वीटभट्टी सुरू करण्याचा परवाना नसतानादेखील कर वाचविण्यासाठी आडमार्गाने वीटभट्टी सुरू करून लाखो रुपये कमविण्याचा गोरखधंदा सुशी,दाबगाव व नलेश्वर येथे सुरू होता.महसूल प्रशासनाच्या डोळ्यात धूळ फेकत विना परवाना वीटभट्टी सुरू केल्याने मूल महसूल प्रशासनाने संबंधित कंत्राटदारांवर १५ लाख ५५ हजार ४० रुपयांचा दंड ठोठावल्याने वीटभट्टी कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहे.

मूल तालुक्यात सन २०२३-२४ या वर्षात प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना,शबरी आवास योजना,यशवंतराव चव्हाण विमुक्त जाती व भटक्या जमाती घरकुल योजना व महाराष्ट्र शासनाने नव्याने सुरू केलेली मोदी आवास योजनेचे जवळपास ३ ते ४ हजारांच्या आसपास घरकुल मंजूर आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात



घरकुलांसाठी मातीपासून तयार केलेल्या विटांची मागणी वाढली आहे.त्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा कर बुडवून जास्तीचा नफा कमावण्याच्या उद्देशाने वीटभट्टी कंत्राटदारांनी महसूल प्रशासनाची परवानगी न घेताच वीटभट्टी सुरू केली.शासनाने निश्चित करून दिलेल्या नियमावलीला बगल देत सुशी येथील ३ दाबगाव २ व नलेश्वर येथील १ अशा सहा कंत्राटदारांनी वीटभट्टी सुरू केल्याने मूलचे तहसीलदार डॉ. रवींद्र होळी यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी दीपक उरकुडे व तलाठी झनक करे यांनी कारवाई करत १५ लाख ५५ हजार ४० रुपयांचा दंड ठोठावला आहे.

> **“ तालुक्यात विनापरवाना वीटभट्टी सुरु करणाऱ्या कंत्राटदारांवर प्रशासनाची करडी नजर असून तालुक्यात कुठेही विनापरवाना वीटभट्टी सुरु असल्याची माहिती असल्यास आम्हाला कळवावे.योग्य ती कारवाई करण्यात येईल.**
> **–डॉ.रवींद्र होळी,तहसीलदार,मूल**

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या मूल तालुका अध्यक्षपदी रोहित कामडे




**मूल । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चंद्रपूर येथे झालेल्या जिल्हा आढावा बैठकीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या मूल तालुका अध्यक्षपदी रोहित कामडे यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव आमदार राजेंद्र जैन यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती करण्यात आली.

रोहित कामडे गेल्या अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते म्हणुन कार्य करीत आहेत. अगोदर त्यांनी राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे मूल तालुका अध्यक्ष म्हणुन यशस्वी कार्य केले आहे. त्याच्या कार्याची दखल घेत ७ जानेवारीला चंद्रपूर येथे आमदार राजेंद्र जैन आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष नितीन भटारकर,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष राकेश सोमाणी यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली.त्यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष नितीन भटारकर आणि मूल तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांना दिले असुन त्याच्या नियुक्तीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे मूल शहर अध्यक्ष आकाश येसनकर, तालुका उपाध्यक्ष महेंद्र गोंगले, वासुदेव पीपरे, महिला तालुका अध्यक्ष संगीताताई गेडाम, तालुका सचिव प्रशांत मेश्राम,राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या मूल शहर अध्यक्ष धारा मेश्राम रोहित शेंडे,आशिष बोरुले,अक्षय बोरुले,निशांत जेगठे, सचिन शेंडे,अंकुश वाढई आदिनी अभिनंदन केले आहे.

# आनंद निकेतन महविद्यालयात विद्यार्थ्यांना एमबीए करिअर मार्गदर्शन

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती व्दारा संचालित आनंद निकेतन महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे दिनांक ३ जानेवारी २०२४ला अकरा वाजता बीकॉम फायनल च्या विद्यार्थ्यांसाठी एमबीए करिअर गायडन्स वर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सौ.लीना किशोर मामीडवार इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च कॉलेज चंद्रपूर येथील असिस्टंट प्रो.डॉ. नियाज शेख यांनी एमबीए ,एम एम एस, सीईटी यासंबंधी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाची माहिती दिली .एमबीए पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी कोणत्याही फर्म,ऑर्गनायझेशन ,इन्स्टिट्यूट अथवा कंपनीमध्ये उच्च पदावर नोकरी करू शकतो असेही त्यांनी आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना पटवून दिले. तसेच एमबीएशी संबंधित कोर्सच्या फायद्याबद्दल सुद्धा त्यांनी मार्गदर्शन केले. हा कोर्स केल्यानंतर विद्यार्थी विभिन्न बँकिंग सेक्टर मध्ये असिस्टंट मॅनेजर म्हणून नियुक्त होऊ शकतो असा एक आशेचा किरण विद्यार्थ्यांना मिळाला. इतकच नव्हे तर इंटरप्रिनर सुद्धा विद्यार्थी होऊ शकतात असे त्यांनी सुचवले. या विषयाशी संबंधित सीईटी एक्झामचे सिलॅबस, प्रवेश फी तसेच या कोर्सला मिळणारी स्कॉलरशिप याविषयी सुद्धा विद्यार्थ्यांना अतिशय महत्त्वाची माहिती त्यांनी दिली.हे व्याख्यान बीकॉम फायनल च्या मुलांसाठी आयोजित करण्यात आले होते. बीकॉम पास झाल्यानंतर पुढे त्यांना रोजगाराच्या काय संधी आहे या विषयाची माहिती विद्यार्थ्यांना या व्याख्यानातून मिळाली. या कार्यक्रमाचे संचालन वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापक कल्पना काळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राध्यापक पल्लवी वैद्य यांनी केले. अल्पावधीत ठरलेल्या या व्याख्यानासाठी वाणिज्य विभागातील प्रा. संदीप ताजने प्रा. आशिष येटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सौ.लीना किशोर मामीडवार इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च कॉलेज चंद्रपूर सहकारी प्रा.डॉ . बिपिन भोगेकर आणि प्रियंका गणवीर यांचा सुद्धा या कार्यक्रमात सिंहाचा वाटा होता. या व्याख्यानाला विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वाणिज्य विभागातील सर्व सहकारी प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले.



# लोकशाही आणि गुन्हेगार लोकप्रतिनिधी

**निवडणुका घोषित झाल्या की निवडणुकांमध्ये बरेचदा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार उभे राहतात. लोकशाहीच्या देवळात निवडून जाणारे लोकप्रतिनिधी स्वच्छ प्रतिमेचे नको का? निदान गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे निवडून जाणार नाही याची काळजी मतदारांनी घेतली पाहिजे. सामान्य जनता व लोकप्रतिनिधी यांना समान कायदा असायला हवा. एकीकडे बेरोजगारांना नोकरी मिळविण्यासाठी चारित्र्य प्रमाणपत्राची मागणी केली जाते.मग लोकप्रतिनिधी म्हणून निवडून जाण्यासाठी गुन्हेगारी पार्श्वभूमी उमेदवारांना सवलत कशी? त्यांनाही चरित्र प्रमाणपत्राची मागणी केली पाहिजे. शिक्षा भोगून आलेल्या गुन्हेगारांना उमेदवारी लढविण्याची संधी मिळता कामा नये. या संदर्भात सर्व राजकीय पक्षांनी समान धोरण ठरविले पाहिजे.**




देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने लोकशाही स्विकारली. लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य या व्याख्येनुसार लोकांच्या कल्याणार्थ, लोकांच्याहितार्थ आपण लोकशाहीचा स्विकार केला. या लोकशाहीप्रणाली व्यवस्थेमध्ये लोकांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष सत्तेमध्ये सहभाग असतो. लोकांचे लोकप्रतिनिधी म्हणजे नगरसेवक, आमदार, खासदार आपण निवडणुकांच्या माध्यमातून निवडून देतो. त्यासाठी आपल्याकडे सार्वत्रिक निवडणूका होत असतात. दर पाच वर्षांनी गावपातळीवरून देशपातळीवर विविध प्रकारच्या निवडणुका होत असतात. ज्यात ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विविध स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा येथे मतदार नागरिक आपले लोकप्रतिनिधी निवडून पाठवितात. या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून देशातील गल्लीपासून ते दिल्लीपर्यंतचा कारभार सुरळीत चालतो. प्रत्येक नागरिकाला देशाचा किंवा राज्याचा कारभार थेट चालविता येत नसल्याने आपण लोकप्रतिनिधी निवडून देतो. याप्रकारे देशाच्या कारभारामध्ये प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सामान्य माणसे सहभागी होत असतात. मतदानाचा हक्क बजावत प्रत्येकांनी मतदान केंद्रावर मतदान करीत लोकशाही बळकट केलेली आहे. परंतु अलीकडे लोकशाहीचे स्वरूप बघता आपली लोकशाही खरोखरच निर्मळ आणि शुद्ध राहिली आहे का? सर्वसामान्य माणसांची राहिली आहे का? असा प्रश्न पडायला लागला आहे. विद्यमान अनेक लोकप्रतिनिधींवर गुन्हे दाखल आहेत. अनेकांना त्या संदर्भात शिक्षाही झाली आहे. अनेक शिक्षा भोगून आले आहेत. तरीही शिक्षा भोगून आलेल्या वा तुरूंगात असताना लोकप्रतिनिधींना निवडणुकीत उभे राहण्याची संधी का दिली जाते? त्यांना निवडणुकीपासून दूर ठेवता येणार नाही का? असे प्रश्न सर्वसामान्य लोकांच्या मनात पडत असतात. तुरुंगवासाच्या संदर्भात आपल्या लोकशाहीत किती मोठा भेदभाव आहे, नाही का? एकीकडे एखाद्या बेरोजगाराला नोकरी लागताना पोलिसांकडून चारित्र्य प्रमाणपत्राची गरज असते. यामध्ये त्याच्या व्यक्तिगत चारित्र्याची माहिती पोलीस विभागाकडून देण्यात येते. त्याच्यावर कुठल्या प्रकारचा गुन्हा दाखल असेल वा तुरूंगवास झाला असेल, शिक्षा झाली असेल तर त्याला त्या नोकरीपासून वंचित ठेवले जाते. गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना नोकरी मिळू नये वा गुन्हेगारी वृत्तीची माणसं नोकरीवर लागू नये असा दृष्टिकोन असावा, आणि तो योग्यही आहे. नोकरीमध्ये निष्प्रभ वृत्तीची माणसं लागायला पाहिजे. त्यातूनच लोककल्याण साधता येते. पण दुर्दैवाने हा नियम आपल्याकडे लोकप्रतिनिधींना लागू नाही. आपल्याकडे लोकनेत्यांना यापासून विशेष सवलत दिली की काय असे वाटते. काही लोकप्रतिनिधींवर गुन्हे दाखल तर सोडाच पण तुरुंगवासाची शिक्षा झाल्यानंतरही निवडणुकीत उभे राहता येते. बरीच नेतेमंडळी जेलमध्ये राहनही निवडून येतात. केवढी मोठी लोकशाहीची थट्टा ! जेव्हा एखाद्या आरोपीला न्यायालयात शिक्षा होते. ती त्या प्रकरणातील कायदे, पुरावे आणि साक्षीदार तपासूनच. दिलेल्या साक्षी आणि पुराव्यामध्ये जर सशक्तता असेल, दोष सिद्ध होत असेल तर माननीय न्यायमूर्ती त्या आरोपीला शिक्षा सुनावतात. न्यायासनापुढे कोणीही लहान–मोठा, श्रेष्ठ कनिष्ठ नसतो. सर्व समान असतात. त्यासाठीच तर न्यायदेवतेच्या डोळ्यावर पट्टी बांधली असते. जेणेकरून न्याय देताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ नये. त्या तत्त्वाला अनुसरून सन्माननीय न्यायमूर्ती प्रकरण तपासूनच आरोपींना दोषी वा निर्दोष ठरवत असतात. एकदा सन्माननीय न्यायालयाने एखाद्याला दोषी ठरवून जेलमध्ये पाठविले तर ती शिक्षा भोगणाऱ्या माणसाला निवडणुकीत उभे राहण्याची संधीच का मिळावी? हा प्रश्न नेहमी उपस्थित होत असतो. तुरुंगात असलेल्या गुन्हेगारांना निवडणुकीत उभे राहन लोकप्रतिनिधी होण्याची संधी मिळत असेल तर हे संकेत चांगले नाही. चुकीचे संकेत जातात. जर हे चांगले संकेत असेल तर मग बेरोजगाराला पण या संधीचा फायदा मिळाला पाहिजे. त्यांनाही तुरुंगवासात असताना वा नंतर नोकरीची संधी मिळाली पाहिजे. पण तसे होत नाही. बेरोजगार जेलमध्ये गेला वा गुन्हा दाखल आहे म्हणून नोकरीपासून त्याला बंचित ठेवले जाते. तर राजकारण्यांना निवडणुका लढवण्याची सवलत दिली जाते. अनेकदा काही मंडळी तुरुंगात राहूनही निवडून आणल्या जातात हे असंतोलनात्मक सूत्र कुठेतरी बदलायला पाहिजे. एकदा कारागृहाची सजा सुनावलेल्या आरोपीला पुन्हा निवडणूक लढण्याची मुभा देण्यात येऊ नये. यासाठी निवडणूक आयोगाकडून पारदर्शकता अपेक्षित आहे. गुन्हेगारांना निवडणुकीत उभे राहता येणार नाही यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत असे अपेक्षित आहे. मतदारांनीही नैतिकता म्हणून अशा गुन्हेगारांना निवडून देऊ नये. परंतु आपल्याकडे व्यक्तीपूजा आहे. ज्या नेत्यांवर आपला विश्वास व श्रद्धा असते त्यांनी काहीही केले तरी चालवून घेतले जाते. गुन्हे केले तरी मतदारराजा ते पोटात घालतो. आपला माणूस म्हणून त्यांच्या विजयार्थ मतदान करतो. आणि आपणच आपल्या हाताने या लोकशाही क्रूर थट्टा करतो. पण निकोप लोकशाहीसाठी आता पुढे हे कुठेतरी थांबवायला. मतदारांनी निदान नैतिकता म्हणून तरी अशा गुन्हेगारांना निवडून देऊ नये. मतदान करताना ध्येयवादी व नैतिकदृष्ट्या स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या उमेदवारांनाच मतदान केले पाहिजे. गुन्हेगारीवृत्तीच्या उमेदवारांकडे मतदारांनी पाठ फिरवली तर कदाचित गुन्हेगारही निवडणुकीत उभे राहण्याची हिंमत करणार नाही. एखादा गरीब माणूस जेलमध्ये गेला तर त्याच्याकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोनच बदलत जाते. समाज त्याला जन्मभर अपराधी म्हणून बघत असतो. पण अवैधरित्या धन कमावलेल्या धनदांडग्यांना, नेत्यांना मात्र आपण लगेच शुद्धतेचे सर्टिफिकेट देऊन टाकतो, निवडणुकांत तोच भाऊ, दादा, साहेब म्हणून गांवभर मिरवतो. अशांना मतदार निवडून आणल्या जाते हे चुकीचे आहे. हे नैतिकेला धरून नाही. अशा गुन्हेगारांच्या हातात देशाची सूत्रे दिली तर पुढे काय? हे सांगायची गरज नाही. गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना निवडणुकीत उभे राहता येणार नाही यासाठी कायदेशीर तरतुदी असल्यातरी कुठेतरी लोकशाही कमी पडतेय. अशा माफीयांना, उमेदवारांना आम्ही निवडून येणार नाही असा संकल्प लोकशाहीप्रेमींनी करणे आवश्यक आहे. निकोप लोकशाहीसाठी सुशिक्षित माणसे, साक्षर माणसे सत्तेमध्ये आली पाहिजे. लोकशाही वाचवण्यासाठी सभागृहात गुन्हेगारी वृत्तीची माणसे निवडून जाणार नाही याची आपण सर्वांनी एक जागृत नागरिक म्हणून काळजी घेण्याची गरज आहे. आपल्या व समाजाच्या, देशाच्या उज्वल भवितव्यासाठी तथा आपल्या लेकराच्या भविष्यासाठी या निर्णयाची खूणगाठ मतदारांनी मनाशी बांधलीच पाहिजे. देश हितासाठी असा सर्वांनी संकल्प बांधल्यास उज्वल भविष्य असलेली लोकशाही पुन्हा बळकट झाल्याशिवाय राहणार नाही. कागदावर असलेली लोकशाही प्रत्यक्षात साकारण्यासाठी आपण सर्व पुढे येऊया!

# संशोधनक्षेत्रालाही लबाडीची वाळवी

एखादा प्रसिद्ध झालेला शोधनिबंध परत घेण्याची वेळ येणे ही मोठी नामुष्की असते. तथापि, असे प्रकार अमेरिकेतील नामांकित विद्यापीठांतही घडले आहेत.ए का राज्यात एकदा उंदीर फार झाले. भलेमोठे उंदीर रात्री बाहेर पडून नासधूस करू लागले. राजाने दवंडी पिटवली की, उंदीर मारून त्याची शेपटी आणून देणाऱ्यास प्रत्येक शेपटीमागे बक्षीस दिलं जाईल. झालं! बक्षिसासाठी लोक उंदीर मारू लागले.त्यासाठी रात्री जागू लागले, बिळं उकरू लागले. पण राज्यातील काही लोक अधिक हुशार होते. त्यांनी उंदीर पाळून त्याची पैदास करायला सुरुवात केली. आता हव्या तितक्या शेपट्या कमी कष्टात मिळू लागल्या. हा मोठ्या कमाईचा धंदा झाला.



हे समजल्यावर राजाने शेपट्यामागे बक्षीस देण्याची योजना बंद केली. त्यावर आता यांचा काही उपयोग नाही म्हणून उंदीर पाळणाऱ्या लोकांनी सगळ्या उंदरांना सोडून दिलं. परिणामतः उंदीर मारा योजना सुरू करण्यापूर्वी जेवढे उंदीर होते त्यापेक्षा योजनेच्या शेवटी जास्तीच झाले.एखादी योजना ज्या हेतूने सुरू केली जाते त्याच्या विरुद्ध परिणाम प्रत्यक्षात दिसतो. योजना आखताना सगळ्या बाजूंचा नीट विचार न केल्यास असं होऊ शकतं. संशोधनाच्या क्षेत्रात असं होत असल्याचा महाशोध आता संशोधकांना लागतो आहे.मूलभूत असो वा उपयोजित; संशोधनातून समाजाच्या भल्याच्या अनेक गोष्टी बाहेर पडत असतात, याविषयी दुमत असण्याचं कारण नाही. आता संशोधनाचं महत्त्व जगातल्या सगळ्याच देशांना पटलं आहे.आपल्या देशात चांगलं संशोधन व्हावं म्हणून जवळजवळ सर्व देशातील सरकारे कमी अधिक जोमाने प्रयत्न करीत आहेत. पण हे प्रयत्न योग्य दिशेने आहेत की कसं? त्यांचा परिणाम योग्य तऱ्हेने होतोय की नाही?सरलेल्या २०२३ वर्षाला याविषयी काही महत्त्वाचं सांगायचंय. या वर्षात विज्ञान–संशोधन क्षेत्रातील लबाडी, खोटेपणा, भ्रष्टाचार उघडकीस येण्याचा आजवरचा उच्चांक गाठला गेला. एखादा प्रसिद्ध झालेला शोधनिबंध परत घेण्याची वेळ येणे ही मोठी नामुष्की असते.अशी तब्बल दहा हजारांवर प्रकरणे या एका वर्षात घडली. ही २०२२च्या तुलनेत एकदम दुपटीने वाढ आहे. आपली चूक लक्षात येऊन एखाद्या संशोधकाने खिलाडू वृत्तीने आपले म्हणणे मागे घेणे हे विज्ञानाच्या तत्त्वाला धरून आहे.पण केवळ चूक नाही तर पद्धतशीरपणे केलेली लबाडी दुसऱ्याने दाखवून दिल्यावर संपादकांनी मागे घ्यायला लावणे किंवा तो लेखच काढून टाकणे, यासारखी लाजिरवाणी गोष्ट नाही. ही दहा हजार प्रकरणं मोजके अपवाद वगळता दुसऱ्या प्रकारातली आहेत. या भ्रष्टाचारात 'हार्वर्ड', 'स्टॅनफर्ड' यासारखी विद्यापीठे, 'नेचर' सारखी प्रतिष्ठित नियतकालिके गोवली गेली आहेत.यावर अनेक शास्त्रज्ञांनी ''हे केवळ हिमनगाचं टोक आहे; उघडकीस न आलेला भ्रष्टाचार यापेक्षा कैकपटींनी मोठा आहे'', अशी प्रतिक्रिया दिली आहे. मला स्वतःला 'नरो वा कुंजरो वा' प्रकारचे अनेक गैरव्यवहार माहिती आहेत जिथे सगळ्यांना खरी गडबड माहिती असली तरी ती सिद्ध करणं अवघड असतं. जे लोक ती सिद्ध करण्यासाठी धडपड करतात त्याचं काय होतं? अमेरिकेतील एका विद्यापीठात पीएच.डी. करत असलेली एक विद्यार्थिनी आपल्या क्षेत्रात आधी झालेल्या कामाचा आढावा घेत होती. त्यात हार्वर्ड विद्यापीठातील एका प्रसिद्ध संशोधिकेच्या संशोधनात काहीतरी गडबड आहे, असं तिला वाटलं.खोलवर पाहिल्यावर हा डेटा खोटा आहे हे सिद्ध करण्याइतका पुरावा आहे, असं तिच्या लक्षात आलं. पण आपल्या मार्गदर्शिकेला हे सांगितल्यावर तिलाच उलट दटावून गप्प राहण्याचा सल्ला दिला गेला. पण या तरुण विद्यार्थिनीला गप्प बसवेना.तिने हे प्रकरण चव्हाट्यावर आणलंच. यावर चौकशी होऊन लबाडीने खोटा डेटा देणाऱ्या हार्वर्डमधील प्राध्यापिकेवर कारवाई झाली. पण या दरम्यान या विद्यार्थिनीला असंख्य अडथळ्यांना तोंड द्यावं लागलं. अलीकडेच या मुलीशी संपर्क करून मी विचारलं की, तू मानसशास्त्र विषयाची आहेस.'विज्ञान भ्रष्टाचारामागील मानसशास्त्र' या विषयावर आपण बरोबरीनी काही लिहूयात का? यावर ती म्हणाली की, आता या क्षेत्राला मी इतकी उबगले आहे की, मी त्यातून पूर्णपणे बाहेर पडले आहे. संशोधनक्षेत्राच्या बाहेर राहूनच अधिक प्रामाणिकपणे काम करता येईल, असं मला वाटतं.खरी परिस्थिती अशी असूनही संशोधन क्षेत्रातली लबाडी बाहेर काढण्याला वाहून घेतलेली काही मंडळी, संघटना, संकेतस्थळे आहेत. पण भ्रष्टाचार इतका आहे की, त्यांचे हात पुरत नाहीत. त्यातून पुरावे जर जोरकस मिळाले नाहीत तर आपल्यावरच बदनामीचे दावे होण्याचा धोका.या क्षेत्रात अशी वेळ का आली? याचं उत्तर त्या उंदरांच्या शेपट्यांमध्ये आहे. उंदराची शेपटी म्हणजे प्रसिद्ध होणारा प्रत्येक शोध निबंध, लिहिला जाणारा प्रत्येक प्रबंध. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांमधील संपूर्ण कारभार या उंदरांच्या शेपट्यांवर चालतो.संशोधन क्षेत्रातल्या नोकऱ्या, बढत्या, प्रतिष्ठेची पदे हे सगळं शेपट्या मोजून ठरवलं जातं. मूळ संशोधन वाचून त्याचं मूल्य ठरवण्याची पद्धत आता परवडेनाशी झाली आहे. नुकत्याच माझे जुने मित्र आणि आता एका बिनीच्या संशोधन संस्थेचे संचालक असलेल्या शास्त्रज्ञाशी झालेल्या संवादात हा विषय निघाला.तेंव्हा ते म्हणाले की, आमच्याकडे एका पदासाठी किमान चारशे अर्ज येतात. सगळ्यांचं संशोधन मुळातून वाचून मूल्यांकन करणं शक्य नाही. आम्ही फक्त किती पेपर कुठल्या नियतकालिकांत प्रसिद्ध केले एवढंच पाहू शकतो.बरं, चांगल्या दर्जाच्या नियतकालिकात पेपर प्रसिद्ध झाला तर तो डोळे झाकून चांगला समजावा, अशी या क्षेत्रात श्रद्धा आहे. कारण त्या नियतकालिकांच्या 'पिअररिव्ह्यू' म्हणजे कसोशीच्या परीक्षणाच्या कसोटीतून तो गेला असल्यामुळे चांगला असलाच पाहिजे.पण ही 'पीअररिव्ह्यू' पद्धतच सदोष, पक्षपाती असल्याचा अहवाल आकडेवारीसह अमेरिकेतील 'प्रोसिडिंग्ज ऑफ नॅशनल अकादमी ऑफ सायन्स' या प्रतिष्ठेच्या नियतकालिकाने गेल्या वर्षी प्रसिद्ध केल्यापासून ही श्रद्धा फोल असल्याचं सिद्ध झालं.म्हणजे संशोधन मुळातून वाचल्याखेरीज त्याचं मूल्यांकन करण्याला पर्याय नाही. शेपट्या मोजून ते होण्यासारखं नाही. तरीही अजून बहुसंख्य निर्णय तसेच होताहेत. शोधनिबंधांची पैदास करणाऱ्या भूमिगत टांकसाळी निघाल्या आहेत.त्या जगातल्या प्रतिष्ठित विद्यापीठांतही शिरल्या आहेत. न केलेले प्रयोग केले असं दाखवणं, खोटाच डेटा लिहिणं, दुसऱ्याचं काम आपलं म्हणून दाखवणं हे आता अपवादात्मक राहिलेलं नाही. प्रामाणिक संशोधकांना यांच्याशी स्पर्धा करावी लागते.त्यात ते मागे पडण्याची शक्यता आहे. यातून अनेक चुकीचे प्रघात पडून तोच राजमार्ग होण्याची भीती आहे. आता आपण विद्यापीठांची रचना, कार्यपद्धती मुळातून बदलण्याचा विचार करतो की, शेपट्या मोजत राहतो, यावर उद्याच्या सर्वसामान्य माणसांनी वैज्ञानिकांवर भरवसा ठेवावा की नाही, हे ठरणार आहे.

# निवडकांची निकड

यंदाचे वर्ष हे निवडणुकांचे आहे. त्यामुळे केंद्र काय किंवा राज्य सरकारे काय, बहुतेक सगळे निर्णय मतपेट्या आणि मतपेढ्या यांच्याकडे लक्ष ठेवूनच होणार, यात शंका नाही. केंद्र सरकार तसेच राज्य सरकारांच्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्ती वेतनाचा एकूण अर्थसंकल्पातला वाटा ही गेल्या तीन दशकांमध्ये क्रमाक्रमाने वाढत गेलेली चिंता आहे. यातूनच जी नवी पेन्शन योजना आली, तिच्यामुळे सरकारी तिजोरीवरचा भार कमी होणार होता. नव्या योजनेत सरकारनेच निवृत्ती वेतनाचा सारा बोजा उचलण्याऐवजी कर्मचाऱ्यांनी नोकरीत असताना केलेल्या बचतीवर आधारित सूत्र तयार करण्यात आले होते. यातून सरकारी पैसा वाचणार होता. मात्र, देशभरात अनुनयाची जी नवी रीत सुरू झाली आहे; तिच्यातूनच अनेक राज्यांनी जुन्या पेन्शन योजनेकडे निर्णय घेतला होता.महाराष्ट्र सरकारनेही त्या दिशेने पहिले महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. या निर्णयाचा दीर्घकालीन आर्थिक परिणाम होणार आहे. मात्र, सरकारी कर्मचारी हे संपाचा आणि आंदोलनांचा धाक दाखवू शकतात. तसेच, हा वर्ग बोलका असतो. त्याच्या नाराजीची भीती सगळ्यांच राज्यकर्त्यांना वाटत असते. लोककल्याणकारी राज्यात वृद्धावस्थेत सर्वांची काळजी सरकारने घेण्याची अपेक्षा चूक नसते. त्यामुळे, एकीकडे आयुर्मान झपाट्याने वाढत असताना आणि आरोग्यावरील खर्च हाताबाहेर जात असताना पूर्ण पेन्शन मिळण्यासाठी जुना पर्याय पुन्हा खुला व्हावा, ही कर्मचारी संघटनांची मागणी तत्त्वत: चूक नव्हती. राज्य सरकारच्या बाजूने पाहायचे तर एकच समाजघटक वृद्ध होत जाणार नाही. हातावर पोट असणारेही वृद्ध होतात आणि त्यांची तर काही व्याधी उपटल्यास ससेहोलपट होते. त्यांच्याकडेही सरकारनेच लक्ष द्यायचे असते. मात्र, निवडकांची निकड भागवणे आणि ती भागवण्यासाठी साऱ्या व्यवस्थेवर संघटितांचा दबाव येणे, हेच आजचे अपरिहार्य घटित आहे. महाराष्ट्राआधी इतर राज्यांनीही जो जुन्या पेन्शनचा निर्णय घेतला, त्यामागेही हेच होते. आता महाराष्ट्र या रांगेत चालला आहे.राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकताच जो निर्णय घेतला आहे; त्याचा लाभ २५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना होईल, असा अंदाज आहे. यात सरकारमान्य संस्थांमध्ये नोकरी करणारे आणि सरकारच्या तिजोरीतूनच वेतन मिळणारे शिक्षकही आहे. एक नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर नेमणूक झालेल्या सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना आता आपल्याला नव्या निवृत्तिवेतन योजनेतच राहायचे आहे की जुन्या योजनेत परत जायचे आहे, याचा निर्णय सहा महिन्यांमध्ये घ्यायचा आहे. एकदा हा पर्याय आल्यानंतर शंभर टक्के कर्मचारी आणि अधिकारी जुन्या योजनेत परत जातील, यात शंका नाही. कारण त्यासाठीच तर आंदोलन चालू होते. तेव्हा आत्ता देण्यात आलेला पर्याय म्हणजे तांत्रिक बाबी पुऱ्या करणे आहे. २००५ नंतर नोकरीत आलेल्या कर्मचाऱ्यांनी नव्या निवृत्ती योजनेत सहभागी होण्यासाठी जे अंशदान केले होते; त्या रकमेची व्यवस्था काय करायची, हेही ठरवावे लागेल. राज्य सरकारने दोन्ही योजनांचा अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी तीन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांची समिती नेमली होती, तेव्हाच एक पाऊल मागे घेतले होते. त्याची तार्किक परिणती नव्या निर्णयाने पुरी झाली आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी डिसेंबरमध्ये राज्य सरकार याबाबत सकारात्मक आहे, असे म्हटले होते. तेव्हा कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतला होता. महाराष्ट्राच्या आधी राजस्थान, हिमाचल प्रदेश, छत्तीसगढ, पंजाब ही राज्ये आधीच जुन्या पेन्शनकडे गेली आहेत. या सर्व राज्यांच्या तिजोरीवरचा भार प्रचंड वाढला आहे. देशात केंद्रीय आणि राज्यांचे मिळून ८७ लाख निवृत्त कर्मचारी व अधिकारी आहेत. या साऱ्यांच्या पेन्शनचा तिजोरीवरचा वार्षिक भार काही वर्षांनी काही लाख कोटी रुपयांच्या घरात जाणार आहे. जुनी पेन्शन आणूनही राजस्थानात अशोक गेहलोत यांचे सरकार गेले आहे, याचाही धडा राज्यकर्ते शिकलेले दिसत नाहीत. राज्य सरकारच्या या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर संसदेत मात्र केंद्र सरकारने कोणत्याही परिस्थितीत जुन्या पेन्शन योजनेकडे परतणार नाही, असे नि:संदिग्ध शब्दांत सांगितले होते. असे सांगण्यासाठी जी दृढ राजकीय इच्छाशक्ती लागते; ती नसल्यानेही अनेकदा राज्याचे आर्थिक भवितव्य लक्षात न घेता असे निर्णय घेतले जातात. याच राज्य सरकारने गेल्या वर्षी हंगामी स्वरुपात कर्मचारी भरण्यासाठी नऊ संस्थांची नेमणूक केली होती. वाढत्या आर्थिक बोज्याची काळजी वाटून सरकारने उद्या मागल्या दाराने एकेक काम खासगी यंत्रणा किंवा संस्थांकडे सोपविण्यास सुरुवात केली तर समाजातील विषमता आणखी वाढेल की कमी होईल, याचा विचार करण्यासारखा आहे. एका बाजूला अंगणवाडी सेविका दर काही काळाने किमान सोयींसाठी सरकारचे दरवाजे ठोठावत राहतात आणि दुसरीकडे, संघटनेच्या ताकदीच्या जोरावर राज्य कर्मचाऱ्यांच्या संघटना हवा तो निर्णय सरकारला घ्यायला लावू शकतात, हे आजच्या आपल्या समाजव्यवस्थेचे चित्र आहे.

## जिल्हा वार्षिक योजनेच्या २३८ कोटी ७१ लाखांच्या प्रारुप आराखड्यास मान्यता

# संभाव्य कोरोनाचा सामना करण्यासाठी आरोग्य विभागांनी पायाभूत सोयीसुविधा निर्माण कराव्यात–पालकमंत्री सत्तार




**हिंगोली –**जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत सन २०२४-२५ या वर्षासाठी २३८ कोटी ७१ लाख ७१ हजार रुपयाच्या प्रारुप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत राज्याचे अल्पसंख्यांक विकास व , पणन मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली मान्यता देण्यात आली.येथील जिल्हा नियोजन समितीची बैठक राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री तथा पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस खासदार हेमंत पाटील, आमदार तान्हाजी मुटकूळे, संतोष बांगर, राजू नवघरे, विप्लव बाजोरिया, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजय दैने, पोलीस अधीक्षक जी. श्रीधर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री अब्दुल सत्तार म्हणाले की, महावितरण विभागाने २५० ट्रान्सफार्मर बसविण्याची कार्यवाही तात्काळ करावी. तसेच ग्रामीण रस्त्याची कामे करण्यासाठी, रुपूर या गावाचा पुराचा धोका कमी करण्यासाठी संरक्षण भिंत बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे सांगितले. सध्या कोरोनाचे रुग्ण आढळून येत आहेत. हा आजार सौम्य प्रकारचा असला तरीही सर्व आरोग्य यंत्रणा सुसज्ज असली पाहिजे. आरोग्य विभागामार्फत सामान्य नागरिकांला आरोग्य सेवा मिळाली पाहिजे. यासाठी आरोग्य विभागानी सर्व पायाभूत सोयीसुविधा निर्माण कराव्यात. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल,असे सांगितले. तसेच वन विभागाने आपणास वितरीत करण्यात आलेला निधी वेळेत खर्च करण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाच्या वाहन, सीसीटीव्ही व इतर सुविधेसाठी निधीची आवश्यकता असल्यास तशी मागणी नोंदवावी, अशा सूचना दिल्या. संभाव्य टंचाईमुळे चारा टंचाई भासणार आहे. चारा टंचाई भासू नये यासाठी निधी कमी पडणार नाही. तसेच जिल्ह्यात रेशीम विकासाला चालना देण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून गायी खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे सांगितले. स्थानिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी कमीत कमी खर्चात चांगल्या प्रतीचे मत्स्यबीज उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल, असेही पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी यावेळी सांगितले. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आरोग्य विभाग, महावितरण विभाग, शालेय शिक्षण विभाग, जलसंधारण, तीर्थस्थळ, पर्यटन स्थळ यासाठी उपलब्ध निधीचे योग्य नियोजन करुन सदर निधी लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी वेळेत खर्च करावा. तसेच सन २०२३-२४ आराखड्यातील विविध कामांवर झालेल्या खर्चाचा तसेच नियोजित प्रस्तावित खर्चाचा देखील आढावा घेतला. सर्वसाधारण वार्षिक योजना, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती उपयोजनेतंर्गत नाविन्यपूर्ण योजनांसाठी झालेल्या खर्चाचा व नियोजित खर्चाचा आढावा घेतला. सर्व संबंधित विभागांनी सन २०२३-२४ अंतर्गत त्यांना प्राप्त झालेल्या निधीचे योग्य नियोजन करुन वेळेत खर्च करावा, अशा सूचनाही पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लोकप्रतिनिधी व समिती सदस्यांनी दिलेल्या सूचना व मागण्याच्या अनुषंगाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने त्याचे निरसन करावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित सदस्यांना वेळेत मिळेल याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले.नियोजन विभागाने दिलेल्या कमाल आर्थिक मर्यादेनुसार सन २०२४-२५ या वर्षासाठी सर्वसाधारण वार्षिक योजनासाठी १६७ कोटी तर अनुसूचित जाती उपयोजनासाठी ५३ कोटी आणि अनुसूचित जमाती उपयोजनेतंर्गत १८ कोटी ७१ लाख ७१ हजार अशा एकूण २३८ कोटी ७१ लाख ७१ हजार खर्चाच्या तयार केलेल्या प्रारुप आराखड्यास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच नियोजन विभागाने दिलेल्या सूचनेप्रमाणे जिल्हा विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरु असून ते अंतिम टप्प्यात आहे. सन २०२७ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलीयन करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने हिंगोली जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा आकार ४५ हजार कोटी करण्याचे उद्दिष्ट आहे. याबाबत गोखले इन्स्टीट्यूट पॉलिटिक्स अँड इकानॉमिकस संस्था, पुणे चे प्राध्यापक हरी सर यांनी सादर केलेल्या जिल्हा विकास आराखड्याच्या (District Strategic Plan) प्रारुपास या बैठकीत मान्यता देण्यात आली. डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत हिंगोली व कळमनुरी या उपगटासाठी मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांच्या २१३.६० लक्ष रुपयाच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. तसेच जनसुविधा विकास आराखडा अंतर्गत मोठ्या ग्रामपंचायतीना नागरी सुविधेसाठी अनुदान यासाठी २९२.५० लक्ष रुपयाच्या आराखड्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच सेनगाव तालुक्यातील मौजे हत्ता नाईक येथील श्री चैतन्य कानिफनाथ मंदिरास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी सन २०२४-२५ चा प्रारुप आराखडा मान्यतेसाठी समितीसमोर सादर केला. तसेच सन २०२३-२४ च्या खर्चाचा सविस्तर आढावा सादर केला. तसेच सन २०२३-२४ च्या खर्चाचे प्रमाण कमी असले तरी लवकरच प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करुन शंभर टक्के निधी खर्च करण्यात येईल, असे सांगितले. तसेच पंतप्रधान पिकविमा योजनेची रक्कम अदा करण्याची कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. ऐनवेळी येणाऱ्या बचतीचे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आल्याचे मा.पालकमंत्री महोदयांनी यावेळी सांगितले. यावेळी बैठकीस जिल्हा नियोजन समितीचे नवनियुक्त सदस्य . बालाजी ढोरे, संजय दराडे, मोबीन मो. यासीन यांच्यासह जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव, समाज कल्याण आयुक्त राजू एडके, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प संचालक छंदक लोखंडे तसेच सर्व विभागाच्या विभाग प्रमुखांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीस उपस्थिती होती.

# आषाढी यात्रेची तयारी सुरू पोलिसांनी मागविल्या सूचना



**पंढरपूर :** पंढरपूरच्या आषाढी यात्रेची प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू झाली असून, पोलिस बंदोबस्ताबाबत भाविकांसह नागरिकांकडून सूचना मागविण्यात येत असल्याची माहिती पोलिस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिली.पंढरपूरच्या आषाढी यात्रेला राज्यासह शेजारची राज्य व देशभरातून १० लाखांहून अधिक भाविक येतात. भाविकांसह वाहनांच्या गर्दीचे नियंत्रण करावे लागते. यंदा १७ जुलैला आषाढी एकादशी आहे. आषाढी यात्रा काळातच मोहरमही आहे.त्यामुळे गावागावासह पंढरपूर यात्रेतील बंदोबस्तामुळे ग्रामीण पोलिसांवर ताण येणार आहे. यासंदर्भात पोलिस अधीक्षक देशपांडे म्हणाले, पंढरपुरातील आषाढी व कार्तिकी या दोन मोठ्या यात्रा आहेत. आषाढी यात्रेची तयारी सुरू झाली आहे.भाविकांना सुलभरीत्या विठ्ठलाचे दर्शन घडावे, कोणत्याही अनुचित घटना घडू नयेत, यासाठी ग्रामीण पोलिस दलाचा सतत प्रयत्न राहिला आहे. तशाप्रकारे यंदाही नियोजन केले जात आहे. मात्र, गर्दीचे नियंत्रण आणखी चांगल्या प्रकारे व्हावे, यासाठी भाविकांसह नागरिकांकडून सूचना मागविण्यात येत आहेत.गतवर्षी आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पोलिस अंमलदारांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. महाद्वारात चेंगराचेंगरी टाळण्यासाठी सुरक्षा कठडे उभारण्याचे चांगल्या प्रकारे नियोजन केले. परिणामी भाविकांना कोणताही त्रास झाला नसल्याचेही त्यांनी सांगितले.पंढरपूरला आषाढी यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांची संख्या सतत वाढत आहे. त्यामुळे भाविक व वाहनांच्या गर्दीचे अधिक उत्तम पद्धतीने नियोजन व्हावे, यासाठी ग्रामीण पोलिस दल प्रयत्नशील आहे. त्यासाठी भाविकांसह नागरिकांनी त्यासंदर्भात waribandobastgmail.com या ई मेलवर सूचना पाठवाव्यात. त्यांचा पोलिस बंदोबस्त करताना विचार केला जाईल.फेब्रुवारी महिन्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याची शक्यता आहे. तर त्यानंतर विधानसभेच्याही निवडणुका होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारी सुरू झाल्याचे पोलिस अधीक्षक सरदेशपांडे यांनी सांगितले.

# मंगळवेढ्यातील अल्पभूधारक शेतकरी मनरेगा लाभांपासून वंचित



**मंगळवेढा–**महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विहिरीचा लाभ नगरपालिका हद्दीतील शेतकऱ्याला मिळत नसल्यामुळे केंद्राच्या महत्त्वाकांक्षी योजनेपासून शहरातील अल्पभूधारक शेतकय्रावर वंचित राहण्याची वेळ आली.सध्या नगरपालिकेवर प्रशासकराज आहे त्यामुळे नागरिकांना भेडसावणारे प्रश्न सोडवण्याची जबाबदारी प्रशासकावर आहे मात्र सध्या नागरिकांना त्यांच्या अनेक प्रश्नांसाठी हेलपाटे मारावे लागत असल्याचे चित्र आहे.त्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील १८ ते ५९ वयातील नोंदणीकृत मजुरांना या योजनेतून रोजगार निर्मिती व स्थावर मालमत्ता निर्मिती केली जाते त्यामध्ये विहीर, फळबाग, शौचालय, नाफेड खड्डे, घरकुल,गांडूळखत, रेशीम उद्योग यासह अनेक योजनेचा लाभ यातून मिळतो यासाठी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतच्या माध्यमातून ही या योजनेचा लाभ दिला जात आहे.मात्र नगरपालिका कार्यक्षेत्रातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना मात्र या योजनेचा लाभ मिळत नाही त्यामुळे शासनाची महत्त्वकांक्षी योजना शहरातील अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी मात्र कागदावर राबवली जात असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. यासाठी क वर्ग असलेल्या नगरपालिकेत ही योजना राबविण्याबाबत ३ मार्च २०१४ या शासन निर्णयानुसार निर्णय घेतला असताना देखील अद्याप नगरपालिका हद्दीत ही योजना राबवली जात नाही.पुन्हा ११ मार्च २०२१ परिपत्रकही काढले. मात्र ही योजना राबविण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला नसल्याने नगरपालिका हद्दीतील अनेक अल्पभूधारक शेतकऱ्यांना विहिरीच्या लाभांपासून वंचित आहेत. आमदार समाधान आवताडे यांचे स्वीय सहायक रावसाहेब फटे यांनी जिल्हाधिकारी यांच्या समवेत झालेल्या स्वीय सहायकाच्या बैठकीत याबाबतची मागणी करून देखील जिल्हा प्रशासनाने देखील याकडे सोयीस्कर रित्या दुर्लक्ष केले.

# लोकांशी बांधिलकी असेल तर जनता तुमच्या पाठीशी राहते–महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे

## आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या जन्मदिनी विविध सामाजिक उपक्रम

### कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही

**गेली ३० ते ३५ वर्षे मी राजकारण आणि समाजकारणात सक्रिय आहे कार्यकर्ता हीच माझी खरी ताकद आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्त्यांनी रोजगार मेळावा महिलांना शिलाई मशीन वाटप मुलींना सायकल वाटप तसेच तालुका भर अन्नदान विविध क्रीडा स्पर्धा यासारखे सामाजिक उपक्रम राबवून समाज उपयोगी कार्य केले आहे. या सर्वांचा मला सार्थ अभिमान आहे. ज्या अपेक्षेने आणि विश्वासाने कार्यकर्त्यांनी माझा वाढदिवस साजरा केला त्या पड्द्या मागून सतत सक्रिय असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला कधीच तडा जाऊ देणार नाही**

**आमदार दिपकआबा साळुंखे पाटील**
**जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दिपक आबा साळुंखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला शहर आणि तालुक्यात भव्य रोजगार मेळावा महिलांना शिलाई मशिन वाटप शालेय विद्यार्थिनींना सायकल वाटप गरीब व गरजू महिलांना हजारो साड्यांचे वाटप तसेच शहर आणि परिसरात हजारो ब्लँकेट वाटप करण्यात आले. तसेच तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अन्नदान करून माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला सामाजिक बांधिलकी जपत शुभेच्छा दिल्या.**





**सांगोला । प्रतिनिधी**

दीपकआबांच्या वाढदिवसानिमित्त समाजातील सर्व घटकांना एकत्रित घेवून कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. दीपकआबा आणि शहाजीबापू यांचे पक्ष व राजकारण वेगवेगळे असले तरी दोघांनी मैत्री जपली आहे. महायुतीच्या सरकारने यावर्षीपासून जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे गणवेष तयार करण्याचे काम महिला बचत गटांना देण्यात येणार आहे. बचत गटातील उत्पादित मालाची विक्री होण्यासाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. लोकांसोबत बांधिलकी असेल तर जनता तुमच्या पाठीशी राहत असते असे मत महिला व बालविकास मंत्री ना.आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दीपकआबा साळुंखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोल्यात भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर आमदार निलेश लंके, आमदार शहाजीबापू पाटील, राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील, कल्याणराव काळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, जेष्ठ नेते बाबुराव गायकवाड, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयमाला गायकवाड, प्रा. पी. सी. झपके, समाधान काळे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजी पाटील, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, जिल्हा नियोजन समिती सदस्य सुरेश पालवे, डॉ.पियूष साळुंखे-पाटील, यशराजे साळुंखे पाटील, अनिलनाना खटकाळे, सचिन लोखंडे, सूर्याजी खटकाळे, दादासाहेब लवटे, अक्षय भांड, अभिषेक आव्हाड यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी रोजगार मेळावा, ब्लँकेट वाटप, साडी वाटप, मुलींना सायकल वाटप, शैक्षणिक साहित्य वाटप, शिलाई मशीन वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार निलेश लंके म्हणाले की, नेत्यांचा वाढदिवस कसा साजरा करावा हे दीपकआबांच्या कार्यकर्त्यांकडून शिकावे. राज्यात बेरोजगारीचा मोठा प्रश्न आहे. ५० हून अधिक कंपन्यांना बोलावून बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी दीपकआबांनी प्रयत्न केला आहे. दीपकआबांच्या कार्यकर्त्यांनी सायकल वाटप, शिलाई मशीन, २५ हजारांहून अधिक महिलांना साडी वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. शहाजीबापू आणि दीपकआबा म्हणजे शोले चित्रपटातील जय विरुची जोडी असल्याचे आ निलेश लंके यांनी सांगितले. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिपकआबा म्हणाले की, गेल्या चार वर्षांत विकास कामांना गती मिळाली आहे. विधानसभेच्या निवडणुकीत आमची युती झाली आणि तीच युती पुन्हा राज्यात अस्तित्वात आली. सांगोला जे ठरवेल तेच राज्यात घडत असतं, हे संपूर्ण राज्याने पाहीलं आहे. कोणीही भ्रमात राहू नये आमच्या दोघांपैकी एकच आमदार असणार आहे असे दीपकआबांनी सांगितले.

# संकेत मोदी यांच्या शाही विवाहाची शहरात धुम

# राजकिय, सामाजिक व अन्य क्षेत्रातील मान्यवरांनी वधुवरांस दिले शुभाशीर्वाद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष तथा मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे माजी सदस्य राजकिशोर मोदी यांचे सुपुत्र संकेत राजकिशोर मोदी यांचा विवाह सोहळा शुक्रवार रोजी संपन्न झाला. हा विवाह सोहळा २ जानेवारी ते ५ जानेवारी या दरम्यान तीन दिवसा दरम्यान संपन्न झाला.

या शाही विवाह सोहळ्यात नवविवाहित वधू वरांस शुभेच्छा व आशीर्वाद देण्यासाठी राज्याचे माजी मंत्री मुजफ्फर हुसेन, दिलीपराव देशमुख, जयदत्त क्षीरसागर, विश्वजित कदम, आ. धीरज देशमुख, आ. लक्ष्मण पवार, आ. नमिता मुंदडा, आ. अमरसिंह पंडित, संजय पवार, अमरनाथ राजुरकर, सुरेश जेथलिया, विनायकराव पाटील, यशवंतराव पाटील, योगेश क्षीरसागर, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष ऍड प्रमोद जाधव, लक्ष्मण मोरे यांच्यासह सामाजिक, साहित्यिक, पत्रकारिता क्षेत्रातील विविध मान्यवर चि. संकेत राजकिशोर मोदी यांच्या विवाह सोहळ्यास उपस्थित होते. या विवाह सोहळ्यासाठी दिल्ली, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, चीन,मुंबई, नागपूर, इंदोर,हैदराबाद, कानपुर,लखनौ, पुणे येथून आलेल्या




स्नेही मित्र परिवाराची संख्या देखील मोठ्या प्रमाणात होती.हा विवाह सोहळा अत्यंत पारिवारिक ,धार्मिक व विधिवत सुनियोजित असा संपन्न झाला. बारात, संगीत आणि विवाह अशा हा तीन दिवसीय विवाह सोहळा अत्यंत पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला. पहिल्या दिवशी म्हणजे दिनांक ०३ रोजी वरास हत्तीवर बसवून सहभागी सर्व मित्र, आप्तेष्ट तथा नातेवाईकांना फेटे बांधून अत्यंत पारंपरिक पद्धतीने काढण्यात आली. यामध्ये घोडे व नागपूर बँडचा ठेक्यावर आकर्षक वेशभुषेत व विद्युत रोषणाईत अंबाजोगाई करांसाठी नेत्रदिपक अशी न-भुतो न-भविष्यती अशी वरात निघाली होती. त्यानंतर मोदी परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक व मित्र परिवार यांच्या उपस्थितीत स्नेहमीलन सोहळ्यात काँटीनेनंटल व पंचपक्वान्न खाण्यासह उपस्थित सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.दुसऱ्या दिवशी दि ४ रोजी मेहंदी, हळदी व संगीताचा कार्यक्रम संपन्न झाला. संगीताचा कार्यक्रम एखाद्या फिल्मफेअर अवॉर्डच्या धर्तीवर असा विविध नृत्य कलाकारांच्या सोबतीने व वराचे सर्व मित्र , नातेवाईक यांच्या कौटुंबिक अशा नृत्याविष्काराने संपन्न झाला. या संगीत रजनीचा संगीतमय सोहळा डोळ्यात साठवून ठेवण्यासाठी पाच हजाराच्या वर असा जनसमुदाय सहभागी झाला होता. या संगीत सोहळ्यात वधुवराचे आई वडील, भाऊ बहीण, अन्य नातेवाईक, मित्र मैत्रिणी यांनी देखील नृत्याविष्कार सादर केला. या संगीतरजनीच्या कार्यक्रमात राज्याचे कृषिमंत्री ना धनंजयजी मुंडे, शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, लातूरचे माजी आमदार त्रिंबक भिसे, जळगाव जिल्हा बँकेचे अध्यक्ष संजय पवार, विजय वाकेकर, माजी आमदार संजय दौंड, राजेश देशमुख, यांच्यासह अन्य प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. अत्यंत नेत्रदीपक व सुश्राव्य असा अंबाजोगाई करांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा दिमाखदार संगीत रजनीचा सोहळा संपन्न झाला. दिनांक ५ रोजी विवाह व स्वागत समारंभाच्या दिवशी देखील सर्व कार्यक्रम अत्यंत पारंपरिक आपल्या संस्कृतीला जपणारे असेच विधी संपन्न झाले ज्यामध्ये फेरे, अक्षदा व अन्य विधीचा समावेश होता. यासाठी देखील विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुणे मंडळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होती. विवाह सोहळ्यानंतर संध्याकाळी अंबानगरीच्या सर्व लोकांसाठी स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या स्वागत सोहळ्यास पंधरा ते वीस हजार नागरिक सहभागी झाले होते. यावेळी लातूरचे माजी आमदार शिवाजीराव कव्हेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष बबन गित्ते, माजी आमदार पृथ्वीराज साठे, अभिजीत देशमुख, अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे, डॉ. राकेश जाधव, डॉ. विश्वजित पवार, डॉ. अनिल मस्के, डॉ. नवनाथ घुगे, डॉ. राजेश इंगोले यांच्यासह राजकिशोर मोदी व मोदी कुटुंबावर प्रेम करणारी मित्र कंपनी मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली होती. या पारंपरिक पद्धतीने साजरा झालेल्या विवाह सोहळ्यात कुठेही व कसल्याही पद्धतीचा बडेजाव केल्याचे दिसून आला नाही. स्वतः राजकिशोर मोदी हे आपल्या कुटुंबियांसह येणाऱ्या प्रत्येक पाहुणे किंवा नागरिकांचे स्वागत हे स्वतः करण्यात आले. या लग्न सोहळ्यात आलेल्या सर्व पाहुण्यांनी भोजनाच्या विविध प्रकारच्या रेसिपीचा आस्वाद घेतला.

# चित्रकार सुजित गिराम यांच्या ग्रामीण जीवन उत्सवाचा जागर मुंबईच्या जहाँगीर आर्ट गॅलरीत दरवळणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील प्रख्यात चित्रकार सुजित गिराम यांच्या कॅनव्हास वरील चित्रांचे ग्रामीण जीवन प्रसंगाचे प्रदर्शन मुंबई येथील प्रसिध्द जहाँगीर आर्ट गॅलरीतून ८ जानेवारी ते १४ जानेवारी दरम्यान भरवले जाणार आहे. या अगोदर ही त्यांचे लंडन, नेदरलँड, दुबई, मुंबई, पुणे, दिल्ली येथे त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. त्यांना बॉम्बे आर्ट सोसासटी मुंबई, आर्ट सोसायटी मुंबई, भारत भवन भोपाळ याद्वारे चित्रांना नामांकने व पारितोषिके प्राप्त झालेली आहेत. तसेच उज्जैन, पुणे, मुंबई या ठिकाणी कार्यशाळेतुन त्यांनी काम केलेले आहेत. बऱ्याच ठिकाणी त्यांचा चित्रांना नामांकन होवुन जतन केलेले आहेत. त्यांच्या चित्रातील ग्रामीण पारंपारीक जिवनातील सण, उत्सवाच्या स्थितीवर आधारीत चित्राचे जास्त प्रसिध्द आकर्षण मानले जाते. त्यांचा चित्रांना देश-विदेश पातळीवर मागणी असते. त्याचा चित्रातली



पांढरा शुभ्र रंग, लाल, निळा मुळ रंग आकर्षक वाटतात. चित्रातील रचना चित्राकडे पहातचं रहावे अशी आकर्षक असतात. त्यामुळेच त्यांना विदेशातुनही ते चित्र आवर्जुन बनवुन द्या अशी मागणी करतात. त्यांचे शिक्षण कैलास कला निकेतन, बीड या प्रख्यात महाविद्यालयातून झाले. तेथे त्यांना प्रा. श्रीकांत पुरी यांचे मार्गदर्शन लाभले. पुढील शिक्षण अभिनव कला महाविद्यालय पुणे येथे जीडीआर्ट पेन्टींग मध्ये पुर्ण झाले. तेथे श्री. दिलीप कदम, श्री. राजेंद्र ढवळे, अरविंद कोळपकर आदी तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले आहे. सर जे.जे. स्कुल ऑफ आर्ट मुंबई येथुन ऊळ.-.एव. पुर्ण झाले. तसेच एम.एफ.ए. पेन्टींग (बाय रिसर्च) छत्रपती संभाजी नगर येथे चालु आहे. तेथे त्यांना डॉ. गिरीश अंबेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. सध्या ते श्री शिवाजी विद्यालय, बीड येथे चित्रकला शिक्षक म्हणुन मागील १० वर्षांपासुन कार्यरत आहेत. श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव दिनकररावजी कदम साहेब तसेच सर्व संचालक मंडळ शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र वाघमारे व सर्व सहकारी यांचे वेळोवेळी त्यांना मार्गदर्शन लाभत आहे. त्यांचा या चित्र प्रदर्शनाला सर्व संचालक, शाळेचे पदाधिकारी व सहकारी शिक्षक - कर्मचाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# रेझिंग डे निमित्त विद्यार्थ्यांना पोलिसांविषयी दिली माहिती

**कौसडी । प्रतिनिधी**

२ जानेवारी ते ८ जानेवारी दरम्यान महाराष्ट्र पोलीस दल स्थापन दिवसानिमित्त जिंतूर तालुक्यातील कौसडी जिल्हा परिषद शाळेमध्ये रेझिंग डे निमित्त शालेय विद्यार्थ्यांना पोलीस ठाण्याच्या कामकाजाबाबत पोलीस शास्त्राबाबत सुरक्षिततेविषयी पोलिसांबद्दल गैरसमज दूर व्हावा पॉलिसिंग वाढवावी यासाठी कार्यक्रम राबविण्यात आले आहे. यावेळी बोरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सरला गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना समजेल अशी माहिती दिली. सोशल मीडिया चा वापर जपून करावा दुचाकी वाहन चालवताना स्वच्छतेची जाणीव ठेवून हेल्मेट वापरावा ट्रिपल सीट बसणे टाळावे चार चाकी वाहन चालविताना सीट बेल्ट लावावे संकट समयी ११२ वर मदत



मागावी मुलींची छेड काढल्यास तुरुंगाची हवा खावी लागते या सह विविध विषयांवर विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली यावेळी पोलीस उपनिरीक्षक अनिल खिल्लारे डॉग स्कोर चे पोलीस उपनिरीक्षक ननवरे बीट जमादार सिद्धार्थ कोकाटे पोलीस कर्मचारी रजवी हुसेन मुख्याध्यापिका सुनीता गाजरे शिक्षक शिक्षिका हे उपस्थित होते.

# न्यायालयीन कामकाज विद्यार्थ्यांना दाखवणे कौतुकास्पदच-मा.न्यायाधिश डी.डी.खोचे साहेब

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

संकल्प विद्या मंदिर शाळेमध्ये क्षेत्रभेट उपक्रमांतर्गत प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू आहे.याचाच एक भाग म्हणून अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालय येथे संकल्प विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली असता श्री अतुल कुलकर्णी व जेष्ठ विधिज्ञ ॲड. आर.एम. धायगुडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना कामकाज कशा पद्धतीने चालते याची माहिती प्रत्येक डिपार्टमेंट ला भेट देऊन अगदी विस्तृत देण्यात आली.यावेळी विद्यार्थ्यांना कोर्टाचे लाईव्ह कामकाज पाहण्यासाठी अंबाजोगाई येथील अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश श्री मा डी.डी. खोचे साहेब यांनी संधी दिली होती. यावेळी दहा कोर्टामध्ये ठराविक विद्यार्थ्यांचा ग्रुप च्या माध्यमातून लाईव्ह कामकाजाचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.यावेळी जेष्ठ विधीतज्ञ ॲड.आर.एम. धायगुडे साहेब यांनी विद्यार्थ्यांना विविध कायदे व कोर्ट विषयी



विस्तृत अशी माहिती देऊन प्रत्येक गोष्टी चे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.सदरील क्षेत्रभेटी साठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर.एस. विभाग प्रमुख श्री गायकवाड व्ही.बी. तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.यावेळी माननीय न्यायाधिश डी.डी.खोचे साहेब यांच्या वतीने विद्यार्थ्यांना केळीचे वाटप करण्यात आले व सदरील भेटीची सांगता करण्यात आली.

# मानवत येथे चक्रवर्ती सम्राट राजे यशवंतरावजी होळकर यांचा राज्यभिषक दिन उत्साहात साजरा

**मानवत । प्रतिनिधी**

मानवत शहरातील नारायण नगर येथील मारोती मंदीराच्या सभागृहा मध्ये दिनांक ६ जानेवारी रोजी चक्रवर्ती सम्राट राजे यशवंतरावजी होळकर यांचा राज्यभिषक दिन साजरा करण्यात आला.या वेळी शहर अध्यक्ष कैलास बनगर , रंगनाथ कोंडगीर , तालूका अध्यक्ष लिंबाजी बनगर , ज्ञानेश्वर कोकरे, गणेश काळे , शंकर तरटे, पवन कचरे, गणेश सलगर , पांडूरंग तरटे , अक्षज्ञ रोडे, लखन खांडेकर , कृष्णा कोक्करे ,शिवम गडदे , बाबा हालनोर, गणेश काळे , ज्ञानेश्वर खांडेकर आदींसह समाज बांधवांची या वेळी उपस्थिती होती.सविस्तर वृत्त असे की,चक्रवर्ती सम्राट राजे यशवंतरावजी होळकर सम्राट (प्रथम) यांचा जन्म वाफगाव, ता.खेड, जि.पुणे येथे ३ डिसेंबर १७७६ म्रुत्यु २८ ऑक्टोबर १८११ भानपुरा मध्यप्रदेश), ते होळकर




साम्राज्याचे महाराजा होते. मध्य प्रदेशातील महेश्वर येथे ६ जानेवारी १८०५ साली राज्याभिषेक करून त्यांनी होळकर मराठा साम्राज्याची स्थापना केली आणि ते पहिले महाराजा झाले.काशीराव, मल्हारराव व विठोजीराव हे त्यांचे थोरले बंधू.यशंवतरावांनी आपल्या पराक्रमाची चुणूक १७९५ घ्या खर्ड्याच्या निजामाविरूद्ध झालेल्या युद्धात दाखवून दिली ह्या युद्धात यशंवतराव आपले पिता तुकोजीरावा सोबत दहा हजार सैन्यासह सामील झाले होते. त्या वेळी त्यांचे वय १९ वर्ष या युद्धात निजामाचा पराभव केला.चक्रवर्ती सम्राट राजे यशवंतरावजी होळकर यांचा समाज बांधवांच्या उपस्थिती मध्ये राज्यभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# एकवेळ मी बाजूला बसेन;पण दीपक साळुंखेंना आमदार करेन-शिवसेना आ.शहाजीबापू पाटील

**सांगोला**-मी सध्या आमदार आहेच. पण, माझ्याबरोबर दीपक साळुंके हेही आमदार असतील. येणाऱ्या पाच वर्षांत आबा आमदार झाले नाहीतर, मी बाजूला होईन. पण आबाला आमदार करेन, अशी घोषणा सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांनी केली. शहाजीबापू पाटील यांच्या या वक्तव्याने राजकीय निरीक्षकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

दरम्यान पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले की, सत्तेशिवाय विकास नाही. दुष्काळी तालुक्याला सुजलाम सुफलाम करण्यासाठी सत्ता ही हवीच असते. आमच्या सत्तेच्या काळात सध्या झालेले परिवर्तन आपण याही डोळा पाहत आहात. त्यामुळे येणाऱ्या काळातही तालुक्याचा सत्तेतून विकास करायचा, हे आम्ही दोघांनीही ठरवले आहे.कार्यक्रमाला महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, आमदार नीलेश लंके, राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील, कल्याणराव काळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत, ज्येष्ठ नेते बाबूराव गायकवाड, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा जयमाला गायकवाड, समाधान काळे, पी. सी. झपके, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तानाजी पाटील, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.अजित पवार गट सोलापूर जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात सर्वपक्षीय नेत्यांच्या समोर शहाजीबापू पाटील यांनी हे विधान केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत सांगोल्यातून कोण आमदार होणार, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.दरम्यान, आमदार शहाजी पाटील व दीपक साळुंखे यांच्या विधानसभेच्या जागेवरून मतभेद असल्याची चर्चा होती. त्यामुळे साळुंखे यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात शहाजीबापू काय बोलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. कारण, मागच्या निवडणुकीत दीपक साळुंखे यांनी शहाजी पाटील यांना मदत केली होती. त्या वेळी साळुंखे यांच्या मदतीची परतफेड करेन, असे पाटील यांनी म्हटले होते. त्यामुळे या वेळी शहाजी पाटील की साळुंखे विधानसभा लढविणार, अशी चर्चा आता होत आहे.





सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .